ANNEXURE 'P/14'



जा.क्र.1454./पोउआ/प्रति/स्वीस/११
पोलीस उप–आयुक्त (प्रतिबंधक)
गुन्हे शाखा, गु.अ.वि., यांचे कार्यालय,
मुंबई.
दिनांक :– ०८/०६/२०११.

प्रति,

श्री.महमुद एम.आबदी,
ए–९०१,मीरा टॉवर्स,
मेघा मॉलच्या समोर,
ओशिवरा,अंधेरी (पश्चिम),
मुंबई–४०००५३.

विषय :– केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेले अपील

संदर्भ :– दिनांक ०४.०६.२०११ रोजीचे पत्र.

महोदय,

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अपिलार्थी श्री.महमुद एम.आबदी, यांनी जन माहिती अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांच्याकडे दिनांक २४.०२.२०११ रोजी माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता.

माहिती अधिकारी (गुन्हे) यांनी त्यांच्या कडील जा.क्र.४१९/माअ०५/२०११, दिनांक ०७.०३.२०११ अन्वये, अपिलार्थीना कळविले आहे की, नमुद माहिती उघड केल्याने,कोणत्याही व्यक्तीचे जीवन व शारिरीक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायद्याची अमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ,गुप्त स्वरूपात दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा मिळालेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती,माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलम ८(१)(छ) अन्वये नाकारलेली होती.

सदर उत्तराने अपिलार्थी यांचे समाधान झाले नाही म्हणुन केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने आमचे कार्यालयात दिनांक ११.०४.२०११ रोजी अपिल केले होते. त्याची सुनावणी दिनांक १६.०५.२०११ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीनी केलेल्या विनंतीनुसार सुनावणीचे आदेश दिनांक १९.०५.२०११ रोजी काढण्यात आलेले आहेत. त्या आदेशाची प्रतही अपिलार्थीना देण्यात आलेली असुन, माहिती अधिकारी (गुन्हे) यांना कार्यवाहीकरिता देण्यात आलेली होती.

दिलेल्या आदेशानुसार खंडणी विरोधी पथक येथील सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या पोउनि श्री.मयेकर यांनी मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे) यांचेकडे परवानगीसाठी नस्ती ठेवली होती. त्याअनुषंगाने मा.अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), यांनी दुरध्वनीवरून आमचेशी चर्चा केली. तसेच सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या पोउनि श्री.मयेकर, माहिती अधिकारी (गुन्हे) हे गैरहजर होते, त्यामुळे त्यांचे ऐवजी सहाय्यक माहिती अधिकारी यांनी सदरची बाब सुनावणीच्या वेळी आमचे निदर्शनास आणुन दिली नाही किंवा त्याबाबत चर्चा केली नाही. त्यामुळे माहितीच्या अधिनियमान्वये आम्ही तसे आदेश पारीत केलेले होते. मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे बरोबर दुरध्वनीवरून झालेल्या चर्चेनुसार आम्ही

दिनांक १९.०५.२०११ रोजी काढण्यात आलेला सुनावणीच्या आदेशात अंशतः बदल करण्यात येत असुन व आपण दिनांक ०४.०६.२०११ रोजी केलेल्या पत्रानुसार केलेल्या विनंतीनुसार निर्णय घेण्यात आलेला असुन, त्याबाबत खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत.

माहिती अधिकारी (गुन्हे) यांनी दिनांक ०७.०३.२०११ अन्वये माहिती नाकारण्यासाठी दिलेल्या उत्तराशी आम्ही सहमत आहोत.

तसेच सदर उत्तराने समाधान झाले नाही तर आपण इच्छुक असल्यास, या संदर्भात नव्वद (९०) दिवसांच्या आत द्वितीय अपिलीय अधिकारी, मा.मुख्य माहिती आयुक्त, माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य नवीन प्रशासकीय इमारत, १३वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे अपिल दाखल करू शकता.

आपला स्नेहांकित,

(बी.एन. शिरसाठ) 8/6
प्रथम अपिलीय प्राधिकारी
पोलिस उप आयुक्त,(प्रतिबंधक),
गुन्हे शाखा, गु.अ.वि.,मुंबई.
०८/५० 1454/11

प्रत कार्यवाहीस्तव:-सहाय्यक पोलीस आयुक्त, माहिती व जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्तालय,बृहन्मुंबई.